# उपनिबंधक सहकारी संस्था (सिडको)

यांचे कार्यालय

## शहर व औद्योगिक विकास महामंडळ,(महाराष्ट्र) मर्यादीत

बेलापुर रेल्वेस्टेशन कॉम्प्लेक्स, टॉवर नं.०८,पाचवा मजला, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई

ई-मेल dyregcidco@cidcoindia.com


सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

जा.क्र.उप. नि/ससं/सिडको/ 3657 /२०२४ | दिनांक :- १०/१२/२०२४

## महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५४(ब)(२) अन्वये आदेश

वाचावे १) मुख्यप्रवर्तक, श्री. क्लोडा फर्नांडीस यांनी दि. ११/११/२०२४ रोजी दाखल केलेला नोंदणी प्रस्ताव.

२) महाराष्ट्र सहकारी संस्था १९६० चे कलम १५४(ब)(२) मधील तरतुद.

अर्जदार श्री. श्री. क्लोडा फर्नांडीस, मुखप्रवर्तक नियोजित **प्रगती** सहकारी गृहनिर्माण संस्था., यांनी दि. ११/११/२०२४ रोजी सदर नियोजित संस्थेच्या नोंदणीसाठी प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे.

वरील प्रमाणे अर्ज/प्रस्ताव दि. ११/११/२०२४ रोजी प्राप्त झाल्यानंतर त्याची छाननी या कार्यालयामार्फत करण्यात आलेली असून मुख्यप्रवर्तक यांनी खालीलप्रमाणे कागदपत्रे दाखल केल्याचे निदर्शनास आलेले आहे.

१) नमूना "अ" दोन प्रतीत सादर केला असून त्यापैकी एकावर रू. ५०/- चा कोर्ट फी स्टॅम्प लावलेला असून आतील पानावर ४७ प्रवर्तकांनी स्वाक्ष-या केल्या आहेत. सर्व रकान्यातील माहिती भरलेली असून शेवटी स्वाक्षरी करणा-या प्रवर्तकांनी सही केलेली आहे. सर्व प्रवर्तकांच्या सहयाच्या खाली मुख्य प्रवर्तक यांनी स्वाक्षरी केलेली आहे.

२) नमूना "ब" सादर केलेला असून त्यामधील सर्व रकान्यांची माहिती भरलेली आहे. सदर माहितीवरून इमारतीमध्ये ६४ रहिवाशी सदनिका असल्याचे दिसून येते. माहिती भरल्याच्या शेवटी मुख्यप्रवर्तक यांनी सही केलेली आहे.

३) नमूना "क" दोन प्रतीत सादर केलेला असून त्यामध्ये एकुण ४७ प्रवर्तकांनी स्वाक्ष-या केलेल्या आहेत. सर्व रकान्यातील माहिती भरलेली असून शेवटी प्रवर्तकांनी स्वाक्ष-या केलेल्या आहेत. त्यांच्या स्वाक्ष-यांच्या खाली मुख्यप्रवर्तक यांनी साक्षांकित म्हणुन त्यांची स्वाक्षरी केलेली आहे.

४) नियोजित संस्थेची योजना सादर केली असून त्याचे अवलोकन करता संस्थेची नोंदणी केल्यास ती सक्षम होईल असे दिसते.

५) रू. २५००/- नोंदणी फी कोषागारात भरणा केली असून तसेच चलन क्र. ०४, दिनांक १२/११/२०२४ रोजीचे प्रकरणासोबत जोडले आहे.

६) नियोजित संस्था स्विकारणार असलेले नमुनेदार उपविधी दोन प्रतीत सादर केले असून त्यामधील मोकळया जागेत आवश्यक ती माहिती भरून तेथे मुख्यप्रवर्तक यांनी स्वाक्षरी केलेली आहे. शेवटच्या पानावर सर्व प्रवर्तकांनी स्वाक्ष-या केलेल्या असून त्यांचे सहयांचे खाली मुख्यप्रवर्तक म्हणुन स्वाक्षरी करण्यात आलेली आहे.

७) मुख्यप्रवर्तकानी दाखल केलेले दि. ३०/०८/२०२४ रोजीचे सिडकोकडील नाहरकत प्रमाणपत्र प्रकरणासोबत दाखल करण्यात आलेले आहे

८) नियोजित संस्थेच्या रक्कमांचा जमा खर्चाचा तपशिल मुख्यप्रवर्तकांच्या स्वाक्षरीने सादर करण्यात आलेले आहे.

९) प्रकरणामध्ये एकुण ६४ सभासदांपैकी ४७ सभासदांनी भरलेल्या स्टॅम्प डयूटी व नोंदणी फी च्या पावत्या (सूची २) प्रकरणासोबत जोडले आहेत.

१०) दि. २४/०७/२०२३ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेमध्ये असोशिएशनची नोंदणी रद्द करण्याचा निर्णय घेतलेला आहे त्या ठरावाची प्रत जोडलेली आहे.

११) **वरिष्ठ विभागीय अधिकारी (वाशी) सिडको लि, नवी मुंबई** यांनी दिनांक ३०/०८/२०२४ रोजी असोशिएशनमधील सभासदांना संस्था नोंदणी करण्याकरीता ना हरकत प्रमाणपत्र दिलेले आहे. वरील प्रमाणे मुख्यप्रवर्तक यांनी दाखल केलेली सर्व कागदपत्रे पहाता सिडको हे जामिन मालक (Leassor) असल्याने **वरिष्ठ विभागीय अधिकारी (वाशी) सिडको लि, नवी मुंबई** यांनी दिनांक ३०/०८/२०२४ रोजी असोशिएशनमधील सभासदांना संस्था नोंदणी करण्याकरीता दिलेले ना हरकत प्रमाणपत्र व मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालयाने नेमून दिलेल्या निकषाप्रमाणे आहेत तसेच नियोजित संस्थेच्या नोंदणी प्रस्तावात आणि एकुण ६४ युनिट पैकी ४७ प्रवर्तक प्रकरणामध्ये सामिल झालेले असल्याने त्याची टक्केवारी ७३ टक्के इतकी आहे व संस्था नोंदणी करण्यासाठी एकुण युनिटच्या किमान **५१** टक्केची पूर्तता होत असल्याने संस्था नोंदणीसाठी खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

१२) दि. २४/०७/२०२३ रोजी पारित केलेल्या ठरावानुसार असोशिएशनने सहा. दुय्यम निबंधक ठाणे यांचेकडे अपार्टमेंट असोशिएशनची (Deed of Declaration) नोंदणी दस्तऐवज क्र. टनन११-१७३५८-२०२४, दिनांक ०१/१०/२०२४ रोजी अन्वये रद्द केलेली आहे व त्याची प्रत जोडली आहे.

## -: आदेश :-

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५४(ब)(२) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी, प्रताप पाटील, उपनिबंधक सहकारी संस्था, सिडको, नवी मुंबई, **प्रगती सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., भूखंड क्र. ०५, सेक्टर ०१, वाशी, नवी मुंबई** या संस्थेची नोंदणी करण्याबाबत आदेश देत आहे.

**( प्रताप पाटील )**
उपनिबंधक, सहकारी संस्था, सिडको,
नवी मुंबई

प्रत,
**श्री. क्लोडा फर्नाडीस, मुखप्रवर्तक प्रगती सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., भूखंड क्र. ०५, सेक्टर ०१, वाशी, नवी मुंबई**

सही/-
उपनिबंधक, सहकारी संस्था, सिडको,
नवी मुंबई